# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०७.०८.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (०१.०८.२०२६ ते ०७.०८.२०२६) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०८.०८.२०२६ ते १२.०८.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | दिनांक | | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| २१.२ | २.६ | ३.० | ३.४ | १५.० | ८.० | २५.८ | पाऊस (मिमी) | | १५ | १० | १२ | ९ | ९ |
| २५.२ | २७.५ | २७.४ | २७.८ | २८.२ | २६.० | २६.४ | कमाल तापमान (अं.से.) | | २७ | २८ | २९ | ३० | ३० |
| २२.८ | २२.६ | २३.० | २२.६ | २२.२ | २२.४ | २२.२ | किमान तापमान (अं.से.) | | २३ | २४ | २४ | २४ | २४ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | स. | ढग स्थिती (आकाश) | ८ | ७ | ५ | ५ | ६ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | दु. | | | | | | |
| ९५ | ८७ | ९६ | ९० | ९७ | ९५ | ९३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ९५ | ९५ | ९२ | ९२ | ९१ |
| ९४ | ८२ | ७८ | ८२ | ९० | ८८ | ९५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ९१ | ९१ | ९१ | ९० | ८६ |
| ६.९ | ७.२ | ५.६ | ५.० | ४.५ | ५.० | ५.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | | २१ | २० | १७ | १५ | १६ |
| प.वा. | नै. | नै. | प. | प. | नै. | प.नै. | स. | वाऱ्याची दिशा | उ. | प. | प. | प. | प. |
| प.नै. | नै. | प.नै. | नै. | नै. | प.वा. | नै. | दु. | | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ७९.० | ६९६.२ | ४१ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ८, ९,१०, ११ व १२ ऑगस्ट रोजी आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील घाट भागात ८, ९ व १० ऑगस्ट रोजी काही ठिकाणी मध्यम स्वरुपाच्या तर ११ आणि १२ ऑगस्ट रोजी काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. मध्य व पूर्व भागात ८, ९ व १० ऑगस्ट रोजी काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची तसेच ११ आणि १२ ऑगस्ट रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १२ ऑगस्ट पर्यंत कमाल तापमान २७.० ते ३०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २३.० ते २४.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ९१ ते ९५%, दुपारची सापेक्ष आद्रता ८६ ते ९१% तसेच वाऱ्याचा वेग ताशी १५ ते २१ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ७ ते १३ ऑगस्ट दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. दिनांक १४ ते २१ ऑगस्ट दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड ॲप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ जिल्ह्याच्या मध्य व पूर्व भागातील शेतकरी बंधूंनी जमिनीमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी खरीप पिकांमध्ये आच्छादनांचा वापर करावा |
| संदेश | | कीटकनाशके व बुरशीनाशकांची फवारणी पावसाची उघडीप पाहून आणि वारा शांत असताना करावी. |
| भात | वाढीची अवस्था | ➢ घाट भागात मुसळधार पावसाची शक्यता असल्याने शेतामध्ये पावसाच्या साठणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल याची व्यवस्था करावी.<br>➢ भात पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी रोप लागणीपासून रोपे स्थिर होईपर्यंत १ ते २ से.मी तर रोपांच्या वाढीच्याअवस्थेत २ ते ३ से.मी. ठेवावी.<br>खोड किडीचा काही ठिकाणी प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच पुढीलप्रमाणे नियंत्रण करावे.<br>➢ आर्थिक नुकसान पातळी: साधारणत: ५% किडग्रस्त काड्या किंवा सरासरी एक अंडीपुंज प्रती चौ.मी. शेतात आढळून आल्यास<br>➢ फिप्रोनिल ५एस.सी. २० मि.ली. किंवा फ्ल्यूबेंन्डॅमाईड ३९.३५ एस.सी. १ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| नाचणी | वाढीची | ➢ तण नियंत्रणासाठी हलकी कोळपणी करून घ्यावी. |

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com


| | | |
|---|---|---|
| | अवस्था | ➢ रसशोषण किडीच्या नियंत्रणासाठी पिवळे व निळे चिकट सापळे किटकसापळे लावावेत<br>➢ नाचणी पिकावरील करपा या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कार्बेडीझिअम १ ते १.५ ग्रॅम प्रती लीटर पाणी या प्रमाणात बांधावर फवारणी करावी |
| मका | शाकिय वाढ | ➢ मका पेरणीस पेरणीनंतर ३० दिवस झाले असल्यास नत्र खताचा हप्ता देण्यासाठी युरिया ३५ किलो प्रती एकरी या प्रमाणात द्यावा<br>➢ फुले मायक्रोन्यूट्रियंट ग्रेड २ याची ५ ते ७ मिलि प्रती पाणी याप्रमाणात फवारणी करावी<br>➢ शक्य असल्यास तण नियंत्रनासाठी खुरपणी करावी. प्रभावी तणनियंत्रणासाठी तण शक्यतो ३ ते ४ पानांवर असताना तणनाशकाची फवारणी करावी<br>➢ मक्याच्या मध्यम ते शेवटच्या पोंगा या वाढीच्या अवस्थेत लष्करी अळीचा १० ते २०% प्रादुर्भाव आढळल्यास खालीलपैकी एका कीटकनाशकाचा आलटून पालटून वापर करावा. ( प्रमाण प्रति १० लिटर पाणी)<br>➢ १. आयसोसायक्लोसिरम १८.१% एस सी (६ मिली) किंवा<br>➢ २. स्पीनेटोरम ११.७% एस सी (५ मिली) किंवा<br>➢ ३. ब्रोफ्लानीलीड २०.०% एस सी (२.५ मिली) किंवा<br>➢ ४. फ्लूबेनडायअमाईड २०.०% डब्लू जी (५ ग्रॅम) किंवा<br>➢ ५. इमामेक्टिन बेंझोएट २.२ % + परमेथ्रीन १५.३% इ सी (१५ मिली) किंवा<br>➢ ६. इमामेक्टिन बेंझोएट १.५ % + प्रोफेनोफोस ३५ % डब्लू डी जी (१५ ग्रॅम)<br>➢ कीटकनाशकांचा वापर चारा पिकावर करू नये. प्रतीक्षा कालावधीचे पालन करावे. |
| ऊस | शाकिय वाढ | ➢ आडसाली लागण करण्यासाठी को ८६०३२, फुले २६५ व फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७ आणि फुले ऊस १५००६ यापैकी कोणत्याही शिफारशीत वाणांची जमिनीच्या मगदूरानुसार उपलब्धता करून घ्यावी.<br>➢ ऊस पिकावर काही ठिकणी गवताळ वाढ या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रसार रोखण्यासाठी प्रादुर्भाव ग्रस्त रोपे उपटून शेतापासून लांब जाळून नष्ट करावीत.<br>➢ मागील आठवड्यामध्ये वाढलेल्या आद्रतेमुळे काही ठिकाणी तपकिरी ठिपके व तांबेरा या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी पावसाची उघडीप पाहून शिफारशीत बुरशीनाशकाचा वापर करावा<br>➢ रुंद पानांच्या व वार्षिक गवत वर्गीय तणाच्या नियंत्रणासाठी मेट्रिब्युझिन ७० % डब्ल्यू. पी. ३० ते ४५ ग्रॅम प्रती १० लीटर पाणी याप्रमाणात पीक व तणे उगविण्यापूर्वी प्रती हेक्टरी ५०० लीटर पाण्यातून फवारणी करावी<br>➢ काही ठिकाणी हुमणीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी मेटारायझिअम २ किलो प्रती एकर याप्रमाणे वापरावे |
| सोयाबीन | शाकिय वाढ | ➢ काही ठिकाणी पाणी साठून राहिल्याने मुळांची कार्यक्षमता कमी होऊन पाने पिवळी पडत आहेत त्यासाठी फुले मायक्रोन्यूट्रियंट ग्रेड दोन ५ मिलि प्रती लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी<br>➢ फुलोरा अवस्थेत असताना कोणत्याही रायसायनिक किटकनाशक अथवा बुरशीनाशकाची फवारणी टाळावी<br>➢ सोयाबीन मध्ये पाने खाणाऱ्या अळयांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे नियंत्रणासाठी जमिनीपासून ३ फुट उंचीवर एकरी ३ या प्रमाणात स्पोडोल्युर असलेले कामगंध सापळे लावावेत. तसेच एकरी २० पक्षी थांबे उभे करावेत. कामगंध सापळे लावले असतील आणि १ महिना झाला असल्यास त्यातील ल्युर बदलणे आवश्यक आहे.<br>➢ फुले सुपर बायोमिक्स १० मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून त्वरित फवारणी फायदेशीर ठरेल. अथवा क्लोरएन्ट्रानिलीप्रोल+ लॅम्बडासायहॅलोथ्रीन हे कीटकनाशक ४ मिली प्रति दहा लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| भुईमूग | वाढीची अवस्था | ➢ काही ठिकाणी पाणी साठून राहिल्याने मुळांची कार्यक्षमता कमी होऊन पाने पिवळी पडत आहेत त्यासाठी फुले मायक्रोन्यूट्रियंट ग्रेड दोन ५ मिलि प्रती लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी<br>➢ सततचा पाऊस आणि हवेतील जास्त आद्रता यामुळे भुईमुग पिकावर टिक्का आणि तांबेरा या रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी फ्ल्यूबेनडॅमाईड ३.५% + हेक्झाकोनॅझोल ५% डब्ल्यू. जी. २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मिरची | शाकिय वाढ | ➢ काही ठिकाणी चुरडा मुरडा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. हा विषाणूजन्य रोग असून रोगाचा प्रसार फुलकिडे, मावा आणि कोळी या रस शोषून घेणाऱ्या किडीमार्फत होतो. ह्या किडी पानातील अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे पानाच्या शिरामधील भागावर सुरकुत्या पडून संपूर्ण पानांची वाढ खुंटते आणि झाड रोगट दिसते. मावा किडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ % एस.एल. प्रति ५ मिली / १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी फिप्रोनील ५ एस.सी. २० मिली. आणि कोळीच्या नियंत्रणासाठी फेनॅक्झाक्विन १० ईसी. २५ मिली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| भेंडी | फळे विकसित होणे | ➢ मागील आठवड्यामद्धे जास्त आद्रता (>८०%) असल्याने भेंडी पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम १० ग्रॅम किंवा हेक्झाकोनॅझोल १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून रोगाची लक्षणे दिसताच १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| टोमॅटो | फळधारणा | ➢ मागील आठवड्यामद्धे ढगाळ आणि हवेमध्ये जास्त आद्रता असल्याने टोमॅटो पिकावर करपा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झीक्लोराईड २५ ग्रॅम किंवा ॲझॉक्झीस्ट्रोबीन १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून २ ते ३ फवारण्या आलटून पालटून कराव्यात. |
| पशुधन | वाढीची | ➢ पावसाळ्यात मेंढ्यांच्या खुरामध्ये चिखल्या होतात तेव्हा पशुवैद्यकाच्या सल्ल्याने मेंढया महिन्यातून एकदा कॉपर सल्फेट किंवा फॉरमॅल्डीहाईड द्रावण असलेल्या उथळ हैादातून संपूर्ण खुर बुडतील अश्या सोडाव्यात.<br>➢ नवजात वासरांची योग्य काळजी घ्यावी जन्मानंतर शक्य .तितक्या लवकर, प्राधान्याने पहिल्या २ ते ४ तासांच्या आत, वासराला |

# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | चीक टक्के एवढा चीक विभागून १० तासांत वासराच्या शरीरवजनाच्या सुमारे २४ जन्मानंतरच्या पहिल्या .पाजावा (कोलोस्ट्रम) वासरासाठी स्वच्छ .पाजावा, कोरडे व चांगल्या प्रतीचे अंथरूण उपलब्ध करून द्यावे तसेच थंडी, पाऊस आणि ओलसरपणापासून त्याचे संरक्षण करावे. |

| | |
|---|---|
| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : ०७.०८.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर